# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयास राष्ट्रीय स्तरावरील A+ (ए प्लस) नॅक मानांकन

ग्रामोध्दार वृत्तसेवा

पाटण: पाटण कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयास बंगलोरच्या राष्ट्रीय स्तरावरील मुल्यांकन (नॅक) समितीकडून नुकतेच ए प्लस मानांकन मिळाले आहे. पाटणसारख्या ग्रामीण दुर्गम भागातील महाविद्यालयास मिळालेले हे यश पाटण तालुक्याच्या शिरपेचात राष्ट्रीय स्तरावरील मानाचा तुरा आहे. तसेच हे मानांकन तालुका वासियांच्यादृष्टीने महत्वाचे व अभिमानास्पद आहे. या उत्तुंग यशाच्या पाठीमागे महाविद्यालयातील सर्व घटकांचे मोलाचे योगदान आहे. यापुढेही तालुक्यात शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे काम कोयना एज्युकेशन सोसायटी नक्की करेल. असा ठाम विश्वास कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.



को.शि.संस्थेचे संचालक संजीव चव्हाण, बा.दे.कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.डी.पवार यांचे अभिनंदन करताना पाटण तालुका पत्रकार संघाचे सदस्य व पदाधिकारी.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयास राष्ट्रीय मुल्यांकन समितीकडून नुकतेच + मानांकन मिळाले. याबद्दल माहिती देण्यासाठी संस्थेच्या सोसायटी कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. संजीव चव्हाण पुढे म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, त्याला तालुकास्तरावरच उच्च शिक्षण मिळावे या उद्देशानेच कोयना एज्युकेशन सोसायटीची निर्मिती करण्यात आली. अगदी सुरुवातीला महाविद्यालय पत्र्याच्या शेडमध्ये भरत होते. तद्नंतर हळूहळू प्रगती करत सोसायटीने पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. यासाठी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांचे खूप मोलाचे सहकार्य मिळाले. असे संजीव चव्हाण यांनी सांगितले.

याबेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले २००४ साली हे महाविद्यालय प्रथमच राष्ट्रीय मुल्यांकनास सामोरे गेले त्यावेळी महाविद्यालयास C+ मानांकन मिळाले. २०१२ मध्ये पुन्हा नॅकला सामोरे गेल्यावर B ग्रेड मिळाली. तिसऱ्यांदा २०१७ ला महाविद्यालय पुन्हा नॅकला सामोरे गेले. त्यात B+ मानांकन मिळाले. तेव्हापासून आम्ही महाविद्यालयास ग्रेड A मिळवण्याच्यासाठी प्रयत्न सुरु केले. महाविद्यालयातील निकालात सुधारणा, विद्यार्थ्यांना सुविधा, नवनवीन कोर्सेस, पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिकदृष्टीने अभ्यास सुरु केले. यात बीसीए, बी कॉम आयटी, पदव्युत्तर शिक्षणात मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र विषय सुरु केले. तसेच मुलांना स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक असणारे ७२ कोर्सेही सुरु केले आणि त्याचा विद्यार्थ्यांना चांगला फायदाही झाला.

कोविड काळात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करत ऑनलाईन शिक्षण दिले. स्पर्धा परीक्षा, पोलिस भरती प्रशिक्षण केंद्र सुरु केल्याने त्याचाही फायदा विद्यार्थ्यांना झाला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांना स्वतंत्र व्यासपीठ मिळावे यासाठी महाविद्यालय कोट्यावधी रुपये खर्च करून अद्ययावत असे सभागृह बांधले. महाविद्यालयाने उन्नत भारत अंतर्गत दुर्गम ठिकाणची पाच गावे (खेडी) दत्तक घेवून, त्याठिकाणी आपत्कालीन प्रशिक्षण, प्रकल्प, शिबिरे, जनावरांसाठी लसीकरण आदींसह उपक्रम राबविले. महाविद्यालयात रेडीओ जॉकी केंद्र सुरु केले. तसेच महाविद्यालय परिसरातील झाड बोलतीय या उपक्रमा अंतर्गत प्रत्येक झाडाचा क्युआर कोड तयार करून वृक्षाची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली. भाभा अनुसंधान संस्थेमार्फत महाविद्यालय परिसरात भूकंपमापन केंद्र बसवण्यात आले आहे. हे

नाविन्यपूर्ण उपक्रम नॅक मुल्यांकन समितीला सर्वाधिक भावले. या सर्वाचा परिपाक म्हणूनच महाविद्यालयातील सर्व घटकांच्या सहकार्यानेच महाविद्यालयाला मुल्यांकन समितीकडून A+ ग्रेड मानांकन मिळाले आहे. यामुळे महाविद्यालयासह तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, सदस्य याज्ञसेनपाटणकर, डॉ. सुहास देशमुख, डॉ प्रल्हाद चव्हाण, कुसुराज पाटणकर यांचेही मोलाचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभले असे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस नॅक समन्वयक डॉ. पी. बाप. फडणीस, सहसमन्वयक डॉ. एम. आर. सपकाळ, डॉ. एस. आर. मुधनेकर, डी. आर. फडतरे, डॉ. एस. एस. तडाखे, डॉ. जी. एस. पहेलबहादुर, सौ. एच. व्ही. काटे, डॉ. डी. एस. पाटील, जीमखाना उपाध्यक्ष डॉ. बी. व्ही. जाधव, प्रा. ए. टी. मुलार, प्रा. एम. डी. जाधव यांची उपस्थिती होती.

### बाळासाहेब देसाई महाविद्यालय म्हणजे लोकनेत्यांचे जिवंत स्मारक

पाटण सारख्या ग्रामीण तालुक्यात कोयना शिक्षण संस्थेमार्फत सुरु झालेले बाळासाहेब देसाई महाविद्यालय हे एकमेव पहिले महाविद्यालय आहे. खडतर परिस्थितीतून महाविद्यालयाची झालेली प्रगती व यातून घडलेले यशस्वी हजारो-लाखो विद्यार्थी हे खरे बाळासाहेब देसाई यांचे जिवंत स्मारक आहे. अशा या यशस्वी महाविद्यालयास राष्ट्रीय पातळीवर A+ मानांकन मिळाले हा लोकनेत्यांसह पाटण तालुक्याचा सन्मान आहे. बा.दे. महाविद्यालयास राष्ट्रीय पातळीवर A+ मानांकन मिळाले बद्दल कोयना शिक्षण संस्थेचे महाविद्यालयाचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी पाटण तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष राजेंद्र पवार, कार्याध्यक्ष शंकर मोहिते, उपाध्यक्ष संजय कांबळे, जालिंदर सत्रे, विक्रांत कांबळे, नितीन खैरमोडे, प्रविण जाधव, गणेश गायकवाड उपस्थित होते.

पाटण प्रतिनिधी- एस. मोहिते